जा. क्र.पशा-१०/व.अ./२४x७/शिगवण/ 3066 /१९
पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांचे कार्यालय
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
रत्नागिरी ४१५ ६१२
दुरध्वनी क्र. ०२३५२-२२२२२२/२७१२५७
फॅक्स क्र. ०२३५२-२७१२५८
E-mail ID :- sp.ratnagiri@gmail.com
sp.ratnagiri@mahapolice.com
दिनांक :- ९/१०/२०१९

---

आरपीएडी

## समजपत्र

प्रति,

श्री.नरेंद्र दगडु शिगवण,
मु.पो.मुरडे रामवाडी,
ता.खेड जि.रत्नागिरी.

**संदर्भ** :- १) आपण दिनांक २४/०९/२०१९ रोजी २४x७ रत्नागिरी या पोर्टलवर केलेला तक्रारी अर्ज.
२) प्रभारी पोलीस ठाणे अधिकारी, खेड पोलीस ठाणे यांचेकडील जा.क्र.१०२९८/२०१९ दि.२८/०९/२०१९

**विषय** :- तक्रारी अर्ज निकाली काढले बाबत.

ooo

आपणास याव्दारे कळविणेत येते की, आपण दिनांक २४/०९/२०१९ रोजी २४x७ रत्नागिरी या पोर्टलवर केलेल्या तक्रारी अर्जात खेड पोलीस ठाणे यांचे दि.११/०८/२०१९ सुचना पत्राच्या अनुषंगाने तक्रार.,असे नमुद केले आहे.

एकंदरीत अर्जामधील मजकुर हा जमीन जागेचे बाबत असुन आपण मौजे मुरडे येथील जमीन मिळकत गट क्र. १३२/११/१२/१६ चे बाबत कुळ लागावे म्हणुन आपण मा.तहसिलदार खेड यांचेकडे दावा दाखल केला होता. त्याचा नंबर ३६/२०१९ असा आहे. सदर दाव्याचा निकाल आपले चुलते काशिराम बाबु शिगवण रा. मुरडे रामवाडी ता. खेड यांचे बाजुने दिनांक ४/०६/२०१८ रोजी लागल्यामुळे गैरअर्जदार श्रीम. ऋचा विवेक देव सध्या रा.मुंबई यांना उशीराने समजल्यामुळे त्यांनी सदर बाबत मा.उपविभागीय अधिकारी खेड यांचेकडे दिनांक १४/१२/२०१८ रोजी टेनन्सी अपील दाखल केले असुन त्याचा नंबर २४/२०१८ असा असुन सदर दावा कोर्ट पेंडींग आहे.

सदर दाव्याच्या नकला मिळणेसाठी श्रीम.ऋचा विवेक देव यांनी आपले चुलते काशिराम बाबु शिगवण हे मयत असुन त्यांचे नावाने खोटा अर्ज केलेला आहे. त्यामुळे त्यांचेवर गुन्हा दाखल करावा असे नमुद केलेले आहे. तसेच संबंधीत दाव्याच्या निकालाच्या नोटीसा स्थानिक तलाठी



Generated by CamScanner

सजा मुरडे यांच्या मार्फत बजावण्यात आल्या. सदर नोटीसा श्री. ज्ञानेश्वर सखाराम गुहागरकर यांनी घेतलेल्या असल्यामुळे त्यांचेवरही गुन्हा दाखल करावा असे अर्जात नमुद केलेले आहे.

त्याबाबत आपण व गैरअर्जदार यांना अर्ज चौकशीसाठी हजर रहाणे बाबत समजपत्र पाठवुन त्यांचे सांगणे प्रमाणे तसे जबाब नोंदविण्यात आले आहेत.

सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने मा.उपविभागिय पोलीस अधिकारी सो.खेड यांचे अभिप्राय प्राप्त झालेले असुन त्यामध्ये आपण मा.तहसिलदार यांचेकडे दाखल केलेल्या अर्जाची मुळ प्रत कागदपत्रात दिसुन येत नाही. गैरअर्जदार यांचे अपील पहाता, त्या स्वतः सदर जमिनीच्या दाव्यातील पक्षकार असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे त्यांना निकालाची प्रत काढुन घेण्याचा पुर्ण अधिकार आहे. त्या त्यांच्या नावानेही सदरच्या नकला काढुन घेवुन शकतात. तसेच ज्ञानेश्वर सखाराम गुहागरकर यांनी सदर नोटीस गैरअर्जदार यांचे संमतीने घेतलेली दिसत आहे. सदरच्या नोटीसा ह्या कोणीही घेतल्या तरी त्यामुळे आपले यांचे नुकसान झालेले नाही. तरी गैरअर्जदार यांना दाव्याच्या नकला तहसिल कार्यालयाकडुन काढुन घेवुन अपील करण्याचा पुर्ण अधिकार आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा गुन्हयाचे कृत्य झालेले दिसुन येत नाही. सबब आपणांस दिनांक ११/०८/२०१९ रोजी समजपत्र पाठविण्यात आले आहे. त्यानंतर आपण दिनांक १५/०८/२०१९ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ७/०९/२०१९ रोजी समजपत्र पाठविण्यात आलेले आहे. मौजे मुरडे येथील जमीन मिळकत गट क्र. १३२/११/१२/१६ चे बाबत स्थानिक तलाठी यांचेकडे माहीती घेता सदर जागेमध्ये कुळ म्हणुन आपली आई श्रीम. शेवंती दगडु शिगवण यांचे नावाची नोंद असुन आपले नावाची नोंद नसल्याचे सांगितले.

तरी आपण केलेल्या सदर अर्जाची चौकशी बंद करण्यात येवुन आपला अर्ज दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे याची नोंद घ्यावी.

(विशाल गायकवाड)
अपर पोलीस अधीक्षक, रत्नागिरी

प्रत सविनय सादर,

१) मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी (२४x७ रत्नागिरी)

Generated by CamScanner